# * ईटीसी-अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र *

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्र प्रवेश | दिव्यांगत्वानुसार तज्ञ (भौतिकोपचार,) व्यावसोपचार, श्रवण व वाचा व मानसोपचार (तज्ञ), विशेष शिक्षक, समाजसेवक | प्रति मंगळवार सकाळी १०.०० ते दुपारी १.३० पर्यंत | प्रवेश कालावधी नियमीत जागा उपलब्धतेनुसार | संचालक, ईटीसी-केंद्र |

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी | संपर्क कालावधी | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाचे वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| २ | प्रतिक्षा यादीमधील दिव्यांगाकरीता बाह्य रुग्ण विभाग | प्रशिक्षण/थेरपी दिव्यांगतत्वानुसार तज्ञ, भौतिकोपचार व्यावसोपचार, श्रवण व वाचा व मानसोपचार तज्ञ शिक्षण विशेष शिक्षक | प्रति मंगळवार सकाळी १०.०० ते सायं ५ वाजेपर्यंत | प्रवेश कालावधी नियमीत जागा उपलब्धतेनुसार | संचालक, ईटीसी-केंद्र |
| ३ | कर्णबधीरांनाCochlear Implant सर्जरीकरीता अर्थसहाय्य योजना | समाजसेवक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ९० दिवस | संचालक ईटीसी-केंद्र |
| ४ | दिव्यांगांना स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य योजना | समाजसेवक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ९० दिवस | संचालक ईटीसी-केंद्र |
| ५ | प्रौढ बेरोजगार दिव्यांगानां अर्थसहाय्य योजना | समाजसेवक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ९० दिवस | संचालक ईटीसी-केंद्र |
| ६ | दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांकरिता शिक्षण/ प्रशिक्षणाकरिता अर्थसहाय्य योजना | समाजसेवक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ९० दिवस | संचालक ईटीसी-केंद्र |
| ७ | दिव्यांगासाठी शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय्य योजना | समाजसेवक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ९० दिवस | संचालक ईटीसी-केंद्र |
| ८ | दिव्यांगांना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरीता अर्थसहाय्य | समाजसेवक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत ९० दिवस | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर | संचालक ईटीसी-केंद्र |
| ९ | विशिष्ट गरजा असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींकरीता अर्थसहाय्य योजना | समाजसेवक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ९० दिवस | संचालक ईटीसी-केंद्र |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | नमुंमपा क्षेत्रातील दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था/संघटनांचे सक्षमीकरण करणे | समाजसेवक | सकाळी १०.०० ते सायं ५.०० पर्यंत | कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर ९० दिवस | संचालक ईटीसी-केंद्र |

## नमुंमपा ई.टी.सी. केंद्रामधील प्रवेश नियमावली

१. नवी मुंबई महानगर पालिका हद्दीमधील विशेष विद्यार्थ्यांस प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल.

२. विशेष विद्यार्थ्यांचे वय कमी असलेले, पालकांची आर्थिक परिस्थिती याची माहिती घेऊन प्रवेशामध्ये विशेष विद्यार्थ्यास प्राधान्य दिले जाईल.

३. दोन विशेष विद्यार्थी प्रवेशाबाबत आले तर त्यांचे वय समान व त्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थितीत समान असेल तेव्हा केंद्रामध्ये प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर विशेष विद्यार्थ्यास प्रवेश दिला जाईल.

४. दिव्यांग मुलांना गणवेश, शैक्षणिक साहित्य, शिक्षण प्रशिक्षण व सकस आहार मोफत पुरविण्यात येईल.

५. नमुंमपा केंद्रामध्ये प्रवेशित दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक व शारिरीक गरजा लक्षात घेऊन केंद्रातील उपलब्ध मनुष्यबळ व इतर साधनेच्या प्रमाणात शिक्षण, प्रशिक्षणाचे तास हे संचालक यांच्या अधिकारात निश्चीत करण्यात येतील. तसेच आवश्यकतेप्रमाणे त्यामध्ये बदल करण्यात येईल.

६. नमुंमपाच्या केंद्राकरीता अत्यंत दर्जात्मक शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा उपलब्ध होत असल्याकारणाने केंद्रामध्ये मा. सर्व साधारण सभेने मंजूर केलेल्या प्रवेश संख्या पूर्ण होऊन प्रतिक्षा यादीमधील संख्या वाढतच जाते. त्याचे कारण दिव्यांग मुले व व्यक्तींना आवश्यक असणारे शिक्षण अथवा प्रशिक्षण हे सातत्याने व वर्षानुवर्ष द्यावे लागते. उदा. जर एखादया मतिमंद मुलगा/ मुलगी ५ वय वर्षाचे असतांना केंद्रामध्ये प्रवेश घेतल्यास पुढील किमान १२ ते १३ वय वर्ष त्यांना प्रशिक्षण कालावधी नियमीत राहतो. त्यामुळे नव्याने प्रवेश देण्यावर मर्यादा येतात. अनेक दिव्यांग मुले शिक्षण व प्रशिक्षणापासून वंचित राहतात. मतिमंद, सीपी, स्वमग्न, बहुविकलांग, अध्ययन अक्षम, अंध दिव्यांग मुलांना आठवडयातून किमान ३ तास ते कमाल १२ तासांचे प्रशिक्षण कालावधी मर्यादीत ठेवण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

७. कर्णबधिर विद्यार्थ्यांकरीता आठवडयातून किमान १० तास ते कमाल ३० तासांचे प्रशिक्षण कालावधी मर्यादीत ठेवण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

८. महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त मुले व मुलींना शिक्षण व प्रशिक्षणाच लाभ देण्याच्या दृष्टीकोनातून बाहय रुग्ण विभागाव्दारे (OPD) केंद्रामधील उपलब्ध असणाऱ्या मनुष्यबळ व इतर साधने यांच्या सहाय्याने विविध सेवासुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. उदा. समुपदेशन, मार्गदर्शन, थेरपी, निदान, उपचार व विविध योजना.

## कर्णबधिरांना Cochlear Implant सर्जरीकरीता अर्थसहाय्य या योजनेचे अटी व शर्ती :-

१. ज्या रुग्णालयामार्फत Cochlear Implant शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे त्या रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२. सदरची योजना अर्जदाराच्या त्याच्या पूर्ण हयायातीत एकदाच लाभ मिळेल.

३. ० ते ५ वयोगटातील विशेष मुलांकडे दिव्यांग प्रमाणपत्र नसल्यास खाली नमुद केलल्या संस्थेमधील तज्ञ व्यक्तीमार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र/अहवाल ग्राहय धरण्यात येईल.

- राष्ट्रीय विकलांग संस्था, बांद्रा (कर्णबधिर)
- राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्था, खारघर (मतिमंद, सेलेब्रल पाल्सी, गतिमंद, स्वमग्न)
- नेत्रतज्ञ, नवी मुंबई महानगर पालिकेचे प्रथम संदर्भ रुग्णालय, वाशी (अंध)
- हाजी अली, मुंबई (अस्थिव्यंग)

## दिव्यांगांना स्वयंरोजगाराकरीता अर्थसहाय या योजनेचे अटी व शर्ती :-

१. तहसीलदार, ठाणे यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत लावणे अनिवार्य आहे.

२. अर्जदाराने आपल्या व्यवसायाबाबत गुमास्ता परवाना सोबत जोडणे आवश्यक आहे.

३. स्वयंरोजगाराकरीता अर्थसहाय मिळण्याकरीता अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त असू नये.

४. अर्जदाराने सुरु करण्यात येणाऱ्या लघुउद्योगाचे संपूर्ण प्रस्ताव नमुंमपा ईटीसी-केंद्राकडून देण्यात येणाऱ्या नुमन्यामध्ये सादर करणे बंधनकारक आहे. सुरु करण्यात येणाऱ्या लघुउद्योगामार्फत प्राप्त होणारे पुढील ०३ वर्षाचे उत्पन्नाचे अंदाजपत्रक सादर करणे आवश्यक आहे.
५. सदरील प्राप्त झालेले आर्थिक सहाय्य हे केवळ सादर करण्यात येणाऱ्या लघुउद्योगाकरीताच वापरण्यात येईल असे स्वयं घोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील.
६. स्वयंरोजगार सुरु करण्याकरीता नवी मुंबई महानगरपालिकेच्या ईटीसी-केंद्रमार्फत लाभार्थ्यास कोणत्याही प्रकारचा भूखंड उपलब्ध करुन देणार नाही. ७. अर्जदारास स्वतःच्या/भाडयाच्या घरामध्ये स्वयंरोजगार सुरु करता येणार नाही.

**प्रौढ बेरोजगार दिव्यांगांना अर्थसहाय योजनेचे अटी व शर्ती :-**

१. तहसीलदार, ठाणे यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत लावणे अनिवार्य आहे.
२. वय वर्षे ४५ ते त्यापुढील दिव्यांग व्यक्तींना संपूर्ण हयातीत सदर योजनेअंतर्गत जास्तीत जास्त १५ वर्ष लाभ घेता येईल.
३. अर्जदाराचे वय हे ४४ वर्ष पूर्ण असणे आवश्यक राहील.
४. मतिमंद व बहुअपंगत्व व्यक्तींना सर्व वयोगटामध्ये प्रथमतः प्राधान्य देण्यात येईल.
५. प्रती वर्षी प्रति अर्जदाराने आर्थिक वर्षामध्ये स्वतंत्रपणे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.
६. अर्जदार नोकरी अथवा उद्योग करत नसल्याचे स्वयं घोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील.
७. दिव्यांग व्यक्ती स्वतः हालचाल न करणारे, मतिमंद (तीव्र व अतितीव्र प्रवर्गातील) व बहुअपंगत्व प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींचे वय वर्ष १८ व त्यापुढील असलेल्या दिव्यांग व्यक्ती सदरच्या योजनेचा लाभ घेऊ शकतील.

**दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांकरीता शिक्षण/प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय योजनेचे अटी व शर्ती :-**

१. ईटीसी-केंद्राबाहेरील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालक/ अर्जदाराने ज्या शाळेत शिक्षण घेत आहे त्या शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
२. महिनाभर वर्ग निरीक्षण केल्याचा अथवा कार्यशाळेस हजर राहिल्याचे ईटीसी-केंद्रामार्फत तयार करण्यात आलेल्या नमुन्यात संबधित शाळेच्या मुख्याध्यापक/व्यवस्थापकांच्या स्वाक्षरीसहीत सादर करणे आवश्यक आहे.
३. ० ते ५ वयोगटातील विशेष मुलांकडे दिव्यांग प्रमाणपत्र नसल्यास खाली नमुद केलल्या संस्थेमधील तज्ञ व्यक्तीमार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र/अहवाल ग्राहय धरण्यात येईल.
राष्ट्रीय विकलांग संस्था, बांद्रा (कर्णबधिर)
राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्था, खारघर (मतिमंद, सेलेब्रल पाल्सी, गतिमंद, स्वमग्न)
नेत्रतज्ञ, नवी मुंबई महानगर पालिकेचे प्रथम संदर्भ रुग्णालय, वाशी (अंध) हाजी अली, मुंबई (अस्थिव्यंग)

**दिव्यांगासाठी शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय योजनेचे अटी व शर्ती :-**

१. सदर योजनेतर्गत अर्जदार शासकीय अथवा शासनमान्य असलेल्या संस्थेत शिक्षण तथा प्रशिक्षण घेत असलेला पाहिजे किंवा RCI, MCI, महाराष्ट्र कौन्सिल फॉर OT/PT मार्फत नोंदणीकृत तज्ञ व्यक्तीकडे प्रशिक्षण घेत असलेला पाहिजे.
२. तसेच शिक्षण तथा प्रशिक्षण घेत असल्याबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र किंवा तज्ञ मार्गदर्शकाचे त्यांच्या लेटरहेडवर प्रमाणीत करुन प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.
३. थेरपी घेणाऱ्या दिव्यांग मुले तथा व्यक्तीने नोंदणीकृत असलेल्या तज्ञ (Rehab. Professional) व्यक्तींकडून प्रशिक्षण घेत असलेले प्रमाणपत्र त्यांच्या नोंदणीकृत असलेल्या प्रमाणपत्रासहीत सादर करणे.
४. ० ते ५ वयोगटातील विशेष मुलांकडे दिव्यांग प्रमाणपत्र नसल्यास खाली नमुद केलल्या संस्थेमधील तज्ञ व्यक्तीमार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र/अहवाल ग्राहय धरण्यात येईल.
राष्ट्रीय विकलांग संस्था, बांद्रा (कर्णबधिर)
राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्था, खारघर (मतिमंद, सेलेब्रल पाल्सी, गतिमंद, स्वमग्न
नेत्रतज्ञ, नवी मुंबई महानगर पालिकेचे प्रथम संदर्भ रुग्णालय, वाशी (अंध)
हाजी अली, मुंबई (अस्थिव्यंग)

**दिव्यांगांना सहायभूत साधने व तंत्रज्ञान याकरीता अर्थसहाय योजनेचे अटी व शर्ती :-**

१. अर्जदार/ दिव्यांगांचे पालकांनी चलनवलन साहित्याच्या आवश्यकतेबाबत वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
२. पात्र अर्जदारास ०७ वर्षातून एकदा सदर योजनेचा लाभ मिळेल.
३. ० ते ५ वयोगटातील विशेष मुलांकडे दिव्यांग प्रमाणपत्र नसल्यास खाली नमुद केलल्या संस्थेमधील तज्ञ व्यक्तीमार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र/ अहवाल ग्राहय धरण्यात येईल.
राष्ट्रीय विकलांग संस्था, बांद्रा (कर्णबधिर)
राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्था, खारघर (मतिमंद, सेलेब्रल पाल्सी, गतिमंद, स्वमग्न)
नेत्रतज्ञ, नवी मुंबई महानगर पालिकेचे प्रथम संदर्भ रुग्णालय, वाशी (अंध)
हाजी अली, मुंबई (अस्थिव्यंग)

**विशिष्ट गरजा असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींकरीता योजनेचे अटी व शर्ती :-**

१. या योजनेमधील १ ते १४ उप योजनांमधील संबंधित योजनेकरिता दरपत्रक जोडणे आवश्यक
२. या योजनेमधील १ ते १४ मधील संबंधित योजनेकरिता वैद्यकीय अधिका-यांचा दाखला जोडणे आवश्यक
३. या योजनेमधील १ ते १४ मधील संबंधित योजनेकरिता विमा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक
४. या योजनेमधील १ ते १४ मधील संबंधित योजनेकरिता संस्था/संघटना/व्यक्ती नोंदणीकृत दाखला/प्रमाणपत्र जोडणे आवश्यक
५. ० ते ५ वयोगटातील विशेष मुलांकडे दिव्यांग प्रमाणपत्र नसल्यास खली नमुद केलेल्या संस्थेमधील तज्ञ व्यक्तीमार्फत देण्यात आलेले प्रमाणपत्र/अहवाल ग्राहय धरण्यात येईल.
राष्ट्रीय विकलांग संस्था,बांद्रा (कर्णबधिर)
राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्था,खारघर (मतिमंद,सेलेब्रल पाल्सी,गतिमंद,स्वमग्न)
नेत्रतज्ञ,नवी मुंबई महानगर पालिकेचे प्रथम संदर्भ रुग्णालय, वाशी (अंध)
हाजी आली, मुंबई (अस्थिव्यंग)
६. सदर योजनेअंतर्गत अर्जदार शासकीय अथवा शासनमान्य असलेल्या संस्थेत शिक्षण तथा प्रशिक्षण घेत असलेला पाहिजे. किंवा RCI,MCI, महाराष्ट्र कौन्सिल फॉर OT/PT मार्फत नोंदणीकृत तज्ञ व्यकतीकडे प्रशिक्षण घेत असलेला पाहिजे.
७. तसेच शिक्षण किंवा प्रशिक्षण घेत असल्याबाबतचे बोनाफाईड सर्टिफिकेट किंवा तज्ञ मार्गदर्शकाचे त्यांच्या लेटरहेडवर प्रमाणीत करुन प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.
८. सदर योजनेअंतर्गत संपुर्ण हयायातीत जास्तीत जास्त ०५ प्रकारच्या यांजनांमध्ये लाभ घेता येईल.

**सूचनाः उप योजनेकरिता**

**१. दिव्यांगाकरिता विवाह योजना**

विवाह नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडण्यात यावी.
विवाह झालेल्या एकत्रित असलेला फोटो जोडण्यात यावा.
विवाह पत्रिका जोडण्यात यावी.
वधु-वर यांचे एकत्रित असलेले बँक खाते असलेले छायांकित प्रत जोडण्यात यावी.
वधु अथवा वराचा प्रथम विवाह असलेबाबतचे स्वयंघोषणापत्र जोडण्यात यावे.
पहिला हप्ता रककम रुपये ५०,०००/- बचत प्रमाणपत्र काढण्याकरिता पात्र लाभार्थ्यांस देण्यात येईल व दुसरा हप्ता उर्वरीत रक्कम ५०,०००/- बचत प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अदा करण्यात येईल. दोन प्रतिशिष्ट व्यक्तींचे शिफारस पत्र जोडणे आवश्यक आहे.
सदरच्या योजनेचा लाभ मिळण्याकरितेचा अर्ज विवाह झाल्यानंतर ०३ महिन्याच्या आत सादर करणे.

**२. दिव्यांग व्यक्तीस दिव्यांगत्वाच्या अनुषंगाने त्याचे घर, इमारत व परिसर यामध्ये अडथळा मुक्त करण्याकरिता अर्थसहाय्य.**

दिव्यांग व्यक्तीचे घर, इमारत व परिसर स्वतःचे मालकी हक्काचे आल्याबाबतचा पुरावा सादर करणे, दिव्यांग व्यक्तीचे घर, इमारत व

परिसर अडथळा मुक्त करण्याकरिता अभियंता यांचे पत्र जोडणे, दिव्यांग व्यक्तीचे घर, इमारत व परिसर अडथळा मुक्त करण्याकरिता करण्यात आलेले खर्चाचे देयक जोडणे.
सदरच्या योजनेचा लाभ मिळण्याकरिता अर्ज काम पुर्ण झाल्यानंतर ०३ महिन्याच्या आत सादर करणे.

## ३. व्यंग सुधार शस्त्रक्रियांसाठी अर्थसहाय्य

व्यंग सुधार शस्त्रक्रिया ठाणे शासकीय रुग्णालयामध्ये होऊ शकत नाही याबाबतचे प्राधिकृत वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र जोडणे.
व्यंग सुधार शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या खर्चाचे देयक अथवा प्राधिकृत वैद्यकीय अधिका-याकडून खर्चाचे प्रमाणपत्र जोडणे.
दिव्यांग व्यक्तीने व्यंग सुधार शस्त्रक्रियेकरिता कोणत्याही शासकीय/निमशासकीय योजनेअंतर्गत अर्ज सादर केलेला नाही याबाबतचे स्वयंघोषणापत्र जोडणे.

## ४. अपंग व्यक्तींना दुर्धर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी अर्थसहाय्य देणे

हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे, हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया, रकताचा कर्करोग, ब्रेन टयुमर,इपिलेप्सी, डोळयातील दृषीपटल सरकणे,निश्चेतनावस्था इ. दुर्धर आजाराच्या वैद्यकीय उपचाराकरिता करण्यात आलेल्या खर्चाचे देयक अथवा प्राधिकृत वैद्यकीय अधिका-याकडून खर्चाचे प्रमाणपत्र जोडणे.
दिव्यांग व्यक्तीने व्यंग सुधार शस्त्रक्रियेकरिता कोणत्याही शासकीय/निमशासकीय योजनेअंतर्गत अर्ज सादर केलेला नाही याबाबतचे स्वयंघोषणापत्र जोडणे.

## ५. मतिमंद व्यक्तींकरिता नॅशनल ट्रस्टमार्फत राबविण्यात येणा-या निरामय तथा तत्सम विमा यांजनांचे हप्ते भरणे.

मतिमंद व्यक्मीने काढलेल्या विमा ची छायांकित प्रत जोडणे.
मतिमंद व्यकतीने विमा काढलेल्या हफते भरणा केलेल्याची पावती जोडणे.
सदरच्या योजनेचा लाभ मिळण्याकरितेचा अर्ज विमा काढल्यानंतर किमान ०३ महिन्याच्या आत सादर करणे.

## ६. दिव्यांग व्यक्तींच्या घराकरिता सोलर कंदील, सौरबंब, सौरचूल, बायोगॅस प्लांट, नळ जोडणी तसेच विद्युत जोडणीकरीता आर्थिक सहाय्य देणे.

दिव्यांग व्यक्तींचे सोलर कंदील,सौरबंब, सौरचूल, बायोगॅस प्लांट,नळ जोडणी तसेच विद्युत जोडणीकरीता स्वतःचे मालकी हक्काचे घर असल्याबाबतचा पुरावा सादर करणे.
दिव्यांग व्यक्तींचे सोलर कंदील,सौरबंब, सौरचूल, बायोगॅस प्लांट,नळ जोडणी अभियंता यांचे प्रमाणपत्र जोडणे.
दिव्यांग व्यक्तींचे सोलर कंदील,सौरबंब, सौरचूल, बायोगॅस प्लांट,नळ जोडणी करण्याकरिता करण्यात आलेले खर्चाचे देयक जोडणे.
सदरच्या योजनेचा लाभ मिळण्याकरिता अर्ज काम पुर्ण झाल्यानंतर ०३ महिन्याच्या आत सादर करणे.

## ७. दिव्यांग विद्यार्थ्यांना गणवेश तसेच विशेष / शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याकरिता आर्थिक सहाय्य देणे.

दिव्यांग विद्यार्थ्यांने शाळेत प्रवेश घेतल्याबाबzत बोनाफाईड सर्टिफिकेट जोडणे.
महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. डिसीटी २३१६/प्र.क्र. १३३/का.१४१७. दिनांक ०५/१२/२०१६ नुसार कार्यवाही करणे. तसेच महाराष्ट्र शासनाव्दारे भविष्य कालावधीमध्ये निर्गमीत केलेल्या शासन निर्णयाच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात येईल.

## ८. दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्व समसावेशक शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याकरिता त्यांच्या मदतनिसांना मदतनिस भत्ता देणे.

मदतनिसांना दरमहा रक्कम रुपये १०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येईल.
दिव्यांग विद्यार्थ्याने सर्व समावेशक शिक्षणाकरिता शाळेमध्ये ८०% उपस्थित असणे आवश्यक आहे.
शाळेत शिक्षण व प्रशिक्षण घेत असल्याबाबत बोनाफाईड सर्टीफिकेट जोडणे.
सर्व शिक्षा अभियान व शिक्षण मंडळ यांनी निश्चीत केलेली अर्हतानुसार मदतनिसांचे प्रमाणपत्र सादर करणे.

## ९. दिव्यांग विद्यार्थ्यांना वाचक व लेखनिकासाठी अर्थसहाय्य पुरविणे.

वाचक व लेखनिकाला दरमहा रक्कम रुपये १०००/-इतके अर्थसहाय्य देण्यात येईल.
दिव्यांग विद्यार्थ्यांचे शाळेमध्ये ८०% उपस्थित असणे आवश्यक आहे.

शाळेत शिक्षण व प्रशिक्षण घेत असल्याबाबचे बोनाईड सर्टीफिकेट जोडणे.
सर्व शिक्षा अभियान व शिक्षण मंडळ यांनी निश्चित केलेली अर्हतानुसार वाचक व लेखकांचे प्रमाणपत्र सादर करणे.

**१०. कर्णबधिरांसाठी दुभाषकांची व्यवस्था करणे.**

दुभाषकास दरमहा रक्कम रुपये १०००/- इतके अर्थसहाय्य देण्यात येईल.
दिव्यांग विद्यार्थ्यांचे शाळेमध्ये ८०% उपस्थित असणे आवश्यक आहे.
शाळेत शिक्षण व प्रशिक्षण घेत असल्याबाबचे बोनाईड सर्टीफिकेट जोडणे.
सर्व शिक्षा अभियान व शिक्षण मंडळ यांनी निश्चित केलेली अर्हतानुसार दुभाषकांचे प्रमाणपत्र सादर करणे.

**११. मतिमंदासाठी कायमस्वरुपी औषधोपचारांची गरज आहे त्यांना मोफत पुरविणे.**

मतिमंद व्यक्ती तथा मुलांकरिता कायमस्वरुपी औषधोपचाराचा आवश्यक असल्याबाबतचे प्राधिकृत वैद्यकीय अधिकाराचे __शिफारस पत्र असणे आवश्यक आहे.

**१२. कुष्ठरुग्णांसाठी औषधे / ड्रेसिंग तसेच सहायभूत साधने व सर्जिकल अप्लायसेंस पुरविणे.**

कुष्ठरुग्ण असलेल्या व्यक्तींकरिता औषधे / ड्रेसिंग आवश्यक असल्याबाबतचे प्राधिकृत वैद्यकीय अधिकाराचे शिफारस पत्र असणे आवश्यक आहे.
कुष्ठरुग्ण असलेल्या व्यक्तींकरिता सहायभुत साधने व सर्जिकल अप्लायसेंस आवश्यक असल्याबाबतचे प्राधिकृत वैद्यकीय अधिकाराचे शिफारस पत्र असणे आवश्यक आहे.
महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. डिसीटी २३१६/प्र.क्र. १३३/का.१४१७, दिनांक ०५/१२/२०१६ नुसार कार्यवाही करणे. तसेच महाराष्ट्र शासनाव्दारे भविष्य कालावधीमध्ये निर्गमीत केलेल्या शासन निर्णयाच्या अधिन राहून कार्यवाही करण्यात येईल.

**नमुंमपा क्षेत्रातील दिव्यांग क्षेत्रात काम करणा-या संस्था/संघटनांचे सक्षमीकरण करणे या योजनेच्या अटी व शर्ती**

१. दिव्यांग क्षेत्रात काम करणा-या संस्था/संघटना या नमुंमपा हद्दीमध्ये कार्यरत असणे आवश्यक आहे.
२. दिव्यांग संस्था केंद्र/राज्य सरकारांमार्फत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे.
३. पालक संघटना हे चॅरीट कमीशनर/केंद्र/राज्य सरकारांतर्गत नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे.
४. दिव्यांग संस्था संघटना हे दिव्यांग क्षेत्रात कार्य करण्याचा किमान ०५ वर्षाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.
५. शिक्षण,प्रशिक्षण देणा-या संस्थांना कमाल ०३ लाख व पालक/दिव्यांग संघटनांना कमाल ०१ लाख रुपये सहाय्य अनुदान देण्यात येईल.
६. पाच वर्षातुन एकदाच सहाय्य अनुदान देण्यात येईल.
७. दिव्यांग संस्था/संघटना यांच्यावर केंद्र/राज्य/पोलीस ठाण्यामध्ये कोणत्याही प्रकारचे आरोपपत्र दाखल झाली नाही याबाबतचे स्वयं घोषणापत्र देणे बंधनकारक आहे.
८. नमुंमपामार्फत देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे नमुंमपा क्षेत्रातील वास्तव करणारे दिव्यांग मुले तथा व्यक्तींकरीताच उपयोगात आणण्याबाबतचे स्वयं घोषणापत्र संस्थानी सादर करणे बंधनकारक आहे.
९. संस्थानी ज्या प्रकल्पाकरीता सहाय्य अनुदान प्रस्तावित केले आहे ते अंदाजपत्रकीय वर्ष योग्य नियांजनाव्दारे व त्याबाबतची अंमलबजावणी करुन प्रस्तावित प्रकल्पावरच खर्च करणे बंधनकारक आहे.
१०. प्रस्तावित प्रकल्पाकरीता नमुंमपा केंद्राकडून तयार करण्यात येणा-या नियमावलीमध्ये फेरबदल व तयार करण्यात येणा-या नियमावलीमध्ये फेरबदल करणे,पालन न करणे किंवा गैरव्यवहार करणे इ. बाबी निदर्शनास आल्यास मा. आयुकत सो. नमुंमपा यांचयामार्फत संबधित संस्था/संघटना यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. प्रदान करण्यात आलेल्या सहाय्यक अनुदान हे व्याजासहित वसूल करण्यात येईल.
११. दिव्यांग संस्था/संघटना यांच्याकडून आलेल्या प्रस्तावाची निवड करण्याचे अधिकार मा.आयुकत सो. नमुंमपा यांच्या अधिकारात राखून ठेवण्यात येत आहे.

**उपरोक्त योजना क्र. १ ते ८ मधील समांतर अटी व शर्ती:**

१. नवी मुंबई महानगर पालिका क्षेत्रात वास्तव्य करीत असलेबाबत पाणी बील, वीज बील, मालमत्ता कर पावती, वास्तव्याचा करारनामा व रेशनकार्ड यापैकी कोणतेही दोन पुरावे सादर करावे

२. आधार कार्ड तथा पावतीची छायांकित प्रत सादर करणे.

३. जन्माचा दाखला अथवा वयाचा पुरावा याबाबतची छायांकित प्रत सादर करणे.

४. अपंगत्वाचे प्रमाणप्रत्र याबाबतची छायांकित प्रत सादर करणे.

५. ० ते १८ वयोगटातील दिव्यांग मुलास कोणत्याही योजनेचा लाभ घेण्याकरीता त्यांचे पालक योजनेचा अर्ज सादर करतील.

६. बौद्धिकदृष्ट्या अक्षम असणारी दिव्यांग मुले अथवा व्यक्तींकरीता त्यांचे पालक अथवा कायदयानुसार पालकत्व धारण केलेली व्यक्ती अर्ज सादर करतील.

७. सदर आर्थिक वर्षामधील योजनेचा लाभ मिळण्याकरीता अर्जदारास इतर कोणत्याही शासकीय, निमशासकीय तसेच नमुंमपामार्फत राबविण्यात येणा-या अपंग योजनेचा लाभ घेतला नाही किंवा घेणार नाही या स्वरुपाचे स्वयं घोषणापत्र सादर करणे बंधनकारक आहे.

८. प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या तत्वावर परंतु संपुर्ण अर्ज व कागदपत्रांची पुर्णतः पूर्तता केल्यास त्या पात्र अर्जदारास लाभ देण्यात येईल.

९. एखादया पात्र अर्जदारासंबधित खोटे कागद पत्र जोडण्यात आले असे निदर्शनास आल्यास पात्र अर्ज अपात्र करण्याचे तथा संबधित लाभार्थ्यांवर कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त नमुंमपा यांना राहील.

*****************************************************************************************